अल्पसंख्यांक विकास विभाग

जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली.

## प्रशिक्षणार्थींची निवड करण्याकरिता जाहीर सूचना

वर्ष २०११-१२ मध्ये पोलीस शिपाई भरती पुर्व परिक्षा प्रशिक्षण योजनेअंतर्गत राज्यातील मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारसी आणि जैन या अल्पसंख्यांक समाजातील इच्छुक उमेदवारांना शासनामार्फत विनामूल्य पोलीस शिपाई भरती पुर्व परिक्षा प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

अल्पसंख्यांक समाजामधील उमेदवारांकडून प्रशिक्षणासाठी अर्ज मागविण्यात येत असून या संदर्भातील निवड चाचणीसाठी उपस्थित राहण्याचे अवाहन करण्यात येत आहे.

**उमेदवाराच्या निवडीसाठी अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील.**

१. प्रशिक्षणार्थीचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रु. २.५० लक्ष (रु.दोन लाख पन्नास हजारा पेक्षा जास्त नसावे.
२. उमेदवार अल्पसंख्यांक (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारसी, आणि जैन) समाजातील असावा.
३. उमेदवार १८ ते २५ वयोगटातील असावा.
४. उमेदवाराची उंची - पुरुष १६५ सें.मी. व महिला १५५ सें.मी., छाती -पुरुष ७९ सेंमी (फुगवुन ८४ सेंमी) असावी.
५. उमेदवार इयत्ता १२ वी उत्तीर्ण असावा.
६. उमेदवारांनी शैक्षणिक अर्हता, रहिवासी दाखला, सेवायोजन कार्यालयांतर्गत नाव नोंदणी दाखला इ. कागदपत्रांच्या सत्यप्रती अर्जासोबत देणे आवश्यक आहे.
७. उमेदवार शारिरीकदृष्ट्या निरोगी व सक्षम असावा.

**प्रशिक्षणाचे स्वरुप.**

१. निवडलेल्या उमेदवारांना एकूण दोन महिने प्रशिक्षण दिले जाईल. या दरम्यान, दररोज तीन तासांचे वर्ग प्रशिक्षण व दोन तासाचे मैदानी प्रशिक्षण देण्यात येईल.
२. निवडलेल्या प्रत्येक प्रशिक्षणार्थीस प्रशिक्षणादरम्यान रु.१५००/- (एक हजार पाचशे फक्त) प्रतिमहा प्रमाणे विद्यावेतन देण्यात येईल.
३. निवडलेल्या प्रत्येक प्रशिक्षणार्थीस प्रशिक्षणा दरम्यान मैदानी प्रशिक्षणानंतर प्रशिक्षणसंस्थेमार्फत चहापान व अल्पोपाहार देण्यात येईल.
४. निवडलेल्या प्रत्येक प्रशिक्षणार्थीस गणवेश साहित्यासाठी (गणवेश, बुट,मोजे, बनियन इ.) रु.१०००/- (एक हजार फक्त) एवढे एकरकमी अनुदान देण्यात येईल.
५. निवडलेल्या प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणा दरम्यान निवासाची व्यवस्था स्वत: करावी लागेल.

इच्छुक उमेदवारांनी दिनांक १३/८/२०११ रोजी सकाळी १० वाजता हिंगोली जिल्हयाच्या मुख्य पोलीस परेड ग्राउंड च्या ठिकाणी अर्ज आणि सर्व कागपत्राच्या छायांकित प्रतीसह उपस्थित राहावे.

**टिप:-** १. यापुर्वी दिनांक १५/६/२०११ रोजी सदर प्रशिक्षणाक्ष्य शारिरीक क्षमता चाचणी साठी हजर राहिलेल्या उमेदवारांना सदर प्रशिक्षण पूर्व चाचणी परीक्षेस येण्याची गरज नाही.

२. दिनांक १५/६/२०११ रोजी शारिरीक क्षमता चाचणीत पात्र ठरलेले परंतु ज्यांचे कागदपत्र अपूर्ण आहेत, अशा उमेदवारांना त्यांचे आवश्यक कागदपत्रे आणुन देण्याची एक संधी देण्यात येत आहे. त्यांनी अपूर्ण कागदपत्रे दिनांक १५/८/२०११ रोजी समक्ष सादर करावीत, त्यानंतर कागदपत्रे स्विकारली जाणार नाही.

स्वाक्षरीत/-

**जिल्हाधिकारी, हिंगोली.**